# योहानाला झालेले प्रकटीकरण
# योहानले व्हयेल प्रकटीकरण
## वळख

प्रकटीकरण हाई पुस्तक नवं करारमधलं शेवटलं पुस्तक शे. तसच हाई शेवट लिखामं वनं प्रेषित योहाननी येशु ख्रिस्तना जन्मानानंतर इसवी. ९५ ना जोडेजोडे ते लिखामा वनं. योहान १:१ अनी त्यानीच योहानकृत शुभवर्तमान अनी योहाननी पहिलं, दुसरं अनी तीसरं पत्र लिखं. हाऊच योहानाले लोकं "ज्यानावर येशुनी प्रिती व्हती" अस म्हणीसन वळखी राहिंतात. योहान १३:२३ येशु ख्रिस्तना सुवार्तामुये पात्म नावना बेटवर जवय शिक्षा भोगी राहिंता त्या येळले त्यानी हाई पुस्तक लिखं. प्रकटीकरण १:९

हाई पुस्तक लिखाणामांगे योहानना हाऊ उद्देश व्हता की, मना वाचनारासले येशुनासंगे ईश्वासु रावाकरता प्रोत्साहन देवाणं अनी येशुना परत येवानं जोडे ऱ्हावामुये त्यासनामा आशा निर्माण करानी योहान १:३;२२:७ त्यानी सर्वा ईश्वासनारासले हाई पत्र लिखं पन विशेष करीसन त्या सात मंडळीसले लिखं ज्यासना उल्लेख अध्याय २—३ मा दखास. योहान स्वतःना लिखाणले देवना जोडेतीन येल संदेश, भविष्यवाणी म्हणीसन सांगस अनी ज्या गोष्टी त्यानी स्वतः दख्यात त्या गोष्टीसन वर्णन तो अलंकारी भाषामा मांडस. हाई जे पुस्तक शे हाई जुना करारमातीन काही शास्त्रभागसले मिळतं जुळतं शे, विशेष करीसन. जखर्या ६:१-८ हाई वचनासंगे त्यानं साम्य शे, तसच सात तुताऱ्या अनी सात वाट्या ह्या देवनी मिसर देशमा आणेल पिढा यानासारख्या शेतस, निर्गम ७—९ प्रकटीकरण हाई शेवटना दिनना वर्णन करस. शेवटमा येशु विजयी कशा व्हई अनी त्यानावर ईश्वास ठेवनारा त्यानासोबत सर्वाकाळ कशा जिवत राहतीन अस ते सांगस. हाई पुस्तकनाद्वारा तुमले ताकिद मिळो अनी येशुना परत येवाविषयी तुमले आशा मिळो.

रूपरेषा

१. योहान सुरवातले स्वतःनी वळख करीसन त्याले भविष्यवाणी कशी प्राप्त व्हयनी हाई सांगीसन तो सुरवात करस. प्रकटीकरण १:१-२०
२. येशुपाईन सात मंडळीसले प्रत्यक्ष मिळेल संदेश योहान देस. प्रकटीकरण २:१—३:२२

३. नंतर तो सात शिक्कासना उल्लेख करस. प्रकटीकरण ४:१—८:५ अनी सात तुतारीसना वर्णन करस. प्रकटीकरण ८:६—११:१९
४. यानानंतर योहान एक धाकला पोऱ्या सात डोकासना श्वापदनासंगे कसं लढाई करस हाई सांगस. प्रकटीकरण १२:१—१४:२०
५. यानानंतर योहान सात क्रोधना वाट्यासबद्दल लिखस प्रकटीकरण १५:१—१६:१८
६. यानानंतर देव त्याना आकाशमाधला शत्रुवर कश विजय मियाडस हाई सांगस. प्रकटीकरण १७:१—२०:१५
७. जो नवा स्वर्ग अनी जी नवी पृथ्वी शेवट ई तिनं वर्णन करस प्रकटीकरण २१:१—२२:२१

### नमस्कार

1 येशु ख्रिस्तनं प्रकटीकरण जे त्याले देवनी दिधं. अनी ज्या गोष्टी लवकर
घडाले पाहिजेत त्या आपला दाससले दखाडाकरता हाई व्हयनं, अनी ख्रिस्तनी दूत
धाडीसन आपला दास योहान याले हाई माहिती दिधी.
2 योहाननी देवना वचनबद्दल अनं येशु ख्रिस्तनी साक्षबद्दल म्हणजे त्यानी जे जे
दखं त्यानाबद्दल साक्ष दिधी.
3 ह्या संदेशना शब्द वाचीन दखाडणारा, अनं भविष्यवाणी त्या ऐकणारा अनं
त्यामा लिखेल गोष्टी पाळणारा ह्या धन्य; कारण ह्या गोष्टी घडी येवानी येळ जोडे
येल शे.

### सात मंडळीसले नमस्कार

4 ✡आशिया प्रांतमाधल्या सात मंडळीसले योहान कडतीन;

त्या देवकडतीन जो शे, जो व्हता अनं जो ई त्यानापाईन त्याना राजासन समोर
ज्या सात आत्मा शेतस त्यासनापाईन,
5 अनी ईश्वसनीय साक्षी, मरेलस मातीन पहिला जन्मेल अनं पृथ्वीवरला
राजासना अधिपती. येशु ख्रिस्त यानापाईन, तुमले कृपा अनं शांती असो.

जो आपलावर प्रेम करस, ज्यानी आपला रक्तघाई तुमले आमले पापसपाईन
मुक्त करं
6 ✡अनी आपलाले राज्य अनी आपला देव अनं पिता याना सेवा करता याजकं
असं करं. त्या येशु ख्रिस्तले गौरव अनं पराक्रम ह्या युगानुयुग शेतस! आमेन.

---

✡ **1:4** १:४ प्रकटीकरण ४:५ ✡ **1:6** १:६ प्रकटीकरण ५:१०

7 ✡दखा, तो ढगससंगे ई! प्रत्येक डोया त्याले दखी, ज्यासनी त्याले भोसकं त्या
बी दखतीन अनी पृथ्वीवरला सर्वा लोके त्यानामुये छाती ठोकीसन शोक करतीन,
असंच व्हई.
8 ✡प्रभु जो देव शे, जो व्हता अनं जो ई, जो सर्वसमर्थ, तो म्हणस, "मी पहिला
अनं शेवटला शे."

## ख्रिस्तनं साक्षात्कार

9 मी योहान, जो तुमना भाऊ अनी येशुमाधला क्लेश, राज्य अनं धीर यासना
तुमनासंगे भागीदार शे, तो मी देवनं वचन अनं येशुबद्दलनी साक्ष यानामुये पात्म
नावना बेटमा व्हतु.
10 प्रभुना दिनले मी आत्मातीन संचरीत व्हयनु, तवय मी आपलामांगे कर्णाना
आवाजमायक मोठा आवाज ऐका.
11 तो बोलना, "तुले जे दखास ते पुस्तकमा लिख अनी ते इफिस, स्मुर्णा,
पर्गम, थुवतीरा, सार्दीस, फिलादेलफिया अनं लावदिकीया या शहरसमाधल्या सात
मंडळीसकडे धाड."
12 मनासंगे बोलणारा आवाज कोणा शे हाई दखाले मी मांगे वळनु, मांगे वळीन
दखस तर सोनाना सात समई
13 अनी त्या समईसना मध्यभागले मनुष्यना पोर्‍यानामायक, पायघोळ कपडा
घालेल, अनी छातीवरतीन सोनाना पट्टा बांधेल, असा कोणी एक माले दखायना.
14 त्यानं डोकं अनं केस बरफनामायक किंवा कापुसनामायक धवळं व्हतं;
त्याना डोया आगना ज्वालानामायक चमकदार व्हतात;
15 त्याना पाय जशा काय भट्टीमातीन काढेल जळजळीत सोनपितळनामायक
व्हतात अनी त्याना आवाज अनेक जलप्रवाहना ध्वनीनामायक व्हता.
16 त्याना उजवा हातमा सात तारा व्हतात; त्याना तोंडमातीन तीक्ष्ण दुधारी
तलवार निंघनी अनी त्याना चेहरा भर दुपारमा चमकणारा सूर्यनामायक व्हता.
17 ✡मी त्याले दखं तवय मी मरेलना मायक त्याना पायजोडे पडनु. मंग त्यानी
आपला उजवा हात मनावर ठेईन माले सांगं, भिऊ नको; मी पहिला अनं शेवटला
शे,
18 अनी जो जिवत तो मी शे! मी मरेल व्हतु तरी दखा मी युगानुयुग जिवत शे,
अनी मरणन्या अनं अधोलोकन्या किल्ल्या मनाजोडे शेतस.

---

✡ **1:7** १:७ मत्तय २४:३०; मार्क १३:२६; लूक २१:२७; १ थेस्सलनी ४:१७; योहान १९:३४,३७; मत्तय २४:३०
✡ **1:8** १:८ प्रकटीकरण २२:१३ ✡ **1:17** १:१७ प्रकटीकरण २:८; २२:१३

19 म्हणीन जे तु दखं, जे शे अनं यानानंतर जे व्हई ते लिखी ठेव;
20 ज्या सात तारा तु मना उजवा हातमा दखात त्यासनं, अनी सोनाना त्या सात
समईसना रहस्य हाई शे; त्या सात तारा ह्या सात मंडळ्यासना दूत शेतस; अनी सात
समई या सात मंडळ्या शेतस.

# 2

## इफिसना मंडळीला संदेश

1 इफिस माधली मंडळीना देवदूतले लिख; जो आपला हातमा सात तारा धरस,
जो सोनाना समईसमातीन चालस, त्यानाकडतीन हाऊ संदेश.
2 तुना कृत्य, कष्ट अनं तुना धीर ह्या माले माहित शेतस; तुले दुर्जन सहन व्हतस
नही, ज्या प्रेषित नव्हतात तरी आम्हीन प्रेषित शेतस अस म्हणतस त्यासनी परिक्षा
तु करी; अनी त्या लबाड शेतस अस तुले दखायनं.
3 तुनामा धीर शे मनामुये तु दुःख सहन करेल शे अनी तु खचना नही.
4 तरी तु मनावरली आपली पहिली प्रिती सोडी यानाबद्दल तुले दोष देणं माले
प्राप्त व्हयनं.
5 तु कोठेन पडेल शे यानी आठवण कर अनं पश्चाताप करीसन आपला पहिला
कृत्य कर; नही तर मी तुनाकडे येसु, अनी तु पश्चाताप नही करा तर तुनी समई
तिना ठिकाणवरतीन काढी.
6 तरी पण तुनामा विशेष हाई शे की, निकलाइता*सना कृत्यसना व्देष तु करस;
त्यासना मी बी व्देष करस.
7 ✡आत्मा मंडळीले काय म्हणस हाई ज्याले कान शे तो ऐको, जो विजय
मिळवस, देवना बागमा जे जिवननं झाड शे, त्यावरनं फळ खावाना अधिकार मी
दिसु.

## स्मुर्णाना मंडळीले संदेश

8 ✡स्मुर्णा माधली मंडळीना देवदूतले लिख; जो पहिला अनं शेवटला, जो मरेल
व्हता अनं परत जिवत व्हयना, तो अस म्हणस.

---

* **2:6 2:6** निकलाइता निकलाइत नावना माणुसना अनुयायी, मनुष्यना अनैतीक वागणुक त्याना आत्माले प्रभावीत करस नही अस या लोकसनं म्हणनं शे. ✡ **2:7** २:७ प्रकटीकरण २२:२ ✡ **2:8** २:८ प्रकटीकरण १:१७; २२:१३

9 तुनं संकट अनं तुनं दारीद्य माले माहित शे, तरी तू धनवान शे; अनी ज्या यहूदी
नहीत पण स्वतःले यहूदी म्हणतस अनं असा लोकसनं निंदायुक्त भाषण बी माले
माहित शे, फक्त सैताननी सभा शे.
10 तुले सहन करानी ज्या संकट शेतस त्यासनं भय धरू नको; दख, तुम्हीन
"मोहमा पडानं" म्हणीन सैतान तुमनापैकी कित्येकसले कैदखानामा टाकणार शे;
अनी तुम्हीन "दहा दिन" संकटमा राहशात. तुले मरणं पडणं तरी ईश्वासु रहा,
म्हणजे मी तुले बक्षिस म्हणीसन जिवन दिसु.
11 ✡"जर तुमले कान शेतस तर आत्मा मंडळीसले काय म्हणस हाई ऐका; जो
विजय मिळावस त्याले दुसरा मरणनी बाधा व्हवाव नही."

## पर्गमना मंडळीले संदेश

12 पर्गम माधली मंडळीना देवदूतले लिख; ज्यानाजोडे तीक्ष्ण दुधारी तलवार
शे तो अस म्हणस;
13 तु कोठे ऱ्हास हाई माले माहित शे, सैताननं आसन तठे शे; तु मनं नाव दृढ धरी
राहेल शे, अनी मना साक्षी, मना ईश्वासु अंतिपाले, तुमनामा म्हणजे सैतान ऱ्हास
तठे मारी टाकं, त्याना दिनसमा बी तु मनावरला ईश्वास सोडा नही.
14 तथापि माले तुले थोड्या गोष्टीसबद्दल दोष देणं शे; ते हाई की तठे तुमनामा
बलाम†नं शिक्षण खरं मानीन राहणारा लोकं शेतस; त्यानी बालाका‡ले इस्राएलना
संतानपुढे, मुर्तिले अर्पण करेल खावाले अनं व्यभिचार करनं, हाई आडफाटा ठेवाले
शिकाडं.
15 त्याप्रमाणे तुनाजोडे निकलाइतासनं तसच प्रकारनं शिक्षण खरं मानीन राहणारा
बी लोक शेतस.
16 यामुये पश्चाताप कर, नही तर मी तुनाकडे लवकरच ईसन आपला
तोंडमाधली तलवारतीन त्यासनासंगे भांडसु.
17 ✡आत्मा मंडळीले काय म्हणस हाई ज्याले कान शे तो ऐको. जो विजय
मिळावस त्याले गुप्त "ठेयल मान्नामातीन मी दिसु." अनी त्याले मी पांढरा खडा
दिसु; त्या खडावर "नवं नाव" लिखेल शे, ते तो खडा लेणाराशिवाय कोणलेच
माहित नही.

## थुवतीराना ख्रिस्ती मंडळीले संदेश

---

✡ **2:11** २:११ प्रकटीकरण २०:१४; २१:८ † **2:14 2:14** बलाम बलाम हाऊ संदेष्टा व्हता (गणना 22:23:24) ‡ **2:14 2:14** बालाका बलाक मवाबना राजा व्हता (गणना 22:4) ✡ **2:17** २:१७ योहान ६:४८-५०

18 थुवतीरा माधली मंडळीना देवदूतले लिख; ज्याना डोया आगना
ज्वालानामायक शेतस अनी ज्याना पाय सोनपितळनामायक चमकदार शेतस, असा
देवना पोर्‍या म्हणस;
19 तुना कृत्य, प्रिती, ईश्वास, सेवा अनं तुना धीर हाई माले माहित शेतस; अनी
तुना आत्तेना कृत्य पहिला कृत्यसपेक्षा जास्त शेतस, हाई बी माले माहित शे.
20 तरी माले तुले दोष देणं शे, तो असा की जी ईजबेल नावनी बाई स्वतःले
देवनी संदेष्टी म्हणस, अनी जारकर्म कराले अनं मुर्तिले अर्पण करेल खावाले मना
दाससले शिकाडीन फसाडस, तिले तू तसं करू देस.
21 तिनी पश्चाताप कराले पाहिजे, म्हणून मी येळ दिधा, तरी आपला
जारकर्मसबद्दल पश्चात्ताप करानी तिले ईच्छा नही.
22 दखा, मी तिले अंथरूणवर पडेल अशी करसु, अनी त्यासनी तिनासंगे करेल
दुष्ट कृत्यसबद्दल पश्चाताप करा नही तर त्यासले मोठा संकटमा पाडसु.
23 मी तीना मांगे चालणारासले मारी टाकसु, म्हणजे सर्व मंडळीसले कळी की,
"ईचार अनं ईच्छा यासनी पारख करनारा" मी शे; अनी तुमले "प्रत्येकले तुमना
कृत्यसनामायक" प्रतिफळ दिसु.
24 पण थुवतीरा आठला बाकीना ज्या तुम्हीन त्या शिक्षणप्रमाणे चालणारा नहीत,
ज्यासले सैतानना खोल म्हणेल गोष्टी शिक्यात नहीत त्या तुमले मी सांगस की, मी
तुमनावर दुसरा भार घालाव नही;
25 पण जे तुमनं शे ते मी येवापावत दृढ धरी रहा.
26 जो विजय मिळावस अनं शेवटपावत मनी कृत्य करत र्‍हास त्यासले, जसा
अधिकार माले पितापाईन मिळना तसं मी राष्ट्रसवर देईन.
27 अनी जसा मातीना भांडासना चुराडा करतस तसा तो लोहदंडतीन त्यासनावर
अधिकार करी.
28 मी त्याले पहाटना तारा दिसु.
29 "आत्मा मंडळीसले काय म्हणस हाई तुले कान शे, तर ऐक."

# 3

## सार्दीसना मंडळीले संदेश

1 सार्दीस माधली मंडळीना देवदूतले लिख,

"ज्यानाजोडे देवना सात आत्मा शेतस अनं सात तारा शेतस तो अस म्हणस."
तुनी कृत्य माले माहित शेतस; तू जिवत शे अस तुले नाव शे, तरी तु मरेल शे हाई
माले माहित शे!
2 जागृत हो, अनी ज्या गोष्टी मरननी वाटवर शेतस त्यासले स्थिर कर; कारण
तुनी कृत्य मना देवना दृष्टीतीन पूर्ण अशी माले दिसनी नहीत.
3 ✡यामुये तू कसं लिधं अनं ऐकं यानी आठवण कर; ते राखी ठेव अनं
पापसपाईन फिर; कारण तू जागृत नही व्हयना तर, जसा चोर येस तसा मी येसु;
मी कोणता येळले तुनावर येसु हाई तुले कळाव नही.
4 तरी ज्यासनी आपला कपडा विटाळात नही, असा थोडाच नावं सार्दीस आठे
तुनाजोडे शेतस; तुम्हीन शुभ्र कपडा परीधान करीसन मनासंगे फिरतीन, कारण
तुम्हीन लायक शेतस.
5 ✡ज्या विजय मिळावतस त्या असा पध्दततीन शुभ्र कपडा घालेल व्हतीन; मी
जिवनी पुस्तकमाधलं त्यासनं नाव खोडावुच नही, अनी मना पितासमोर अनं त्याना
दूतसमोर मी त्यासनं नाव उघडपणतीन जाहीर करसु.
6 आत्मा मंडळीसले काय म्हणस हाई ज्याले कान शे तो ऐको.

## फिलादेलफियाना मंडळीले संदेश

7 फिलादेलफिया माधली मंडळीना देवदूतले लिख; जो पवित्र अनं सत्य शे
ज्यानाजोडे दावीदनी किल्ली शे, जो दरवाजा तो उघडस अनी कोणी बंद कराव
नही, अनी जो दरवाजा तो बंद करस अनी कोणी उघडस नही, तो अस म्हणस.
8 तुना कृत्य माले माहित शेतस दख, मी तुनापुढे दार उघडी देयल शे, ते
कोणकडतीन बंद व्हस नही; तुले थोडी ताकद शे, तरी तू ईश्वासतीन मना वचनले
पाळात अनं मना नावले नाकारा नही, हाई माले माहित शे.
9 दखा, ज्या सैतानना सभाना राहिन आपलाले यहूदी म्हणतस, पण त्या यहूदी
नहीत, त्या खोटं बोलतस; त्यासनापैकी काही तुले दिसु; दखा, त्या ईसन तुना
पायसजोडे नमन करतीन अनं मी तुनावर प्रिती करेल शे हाई समजी लेतीन, अस
मी करसु.
10 कारण तु मनं धीरनं वचन राखेल शे म्हणीन पृथ्वीवर राहणारा लोकसनी
परिक्षा व्हवाणा जो सर्व जगवर परिक्षा प्रसंग येणार शे त्या परिक्षा प्रसंगपाईन मी
बी तुले सांभाळसु.

---

✡ **3:3** ३:३ मत्तय २४:४३,४४; लूक १२:३९,४०; प्रकटीकरण १६:१५ ✡ **3:5** ३:५ प्रकटीकरण २०:१२; मत्तय १०:३२; लूक १२:८

11 मी लवकर येस; कोणी तुना विजयना बक्षिस लेवाले नको म्हणीन जे तुनं शे
पक्क धरी ठेव.
12 ✡ज्या विजय मिळावतस त्यासले मी आपला देवना मंदिर माधला स्तंभ
करसु; त्या तठेन कधीच बाहेर जावावु नही; त्यासनावर मना देवनं नाव, स्वर्गमातीन
मना देवपाईन उतरनारं नवं यरूशलेम, मना देवनं नगर, यानं नाव; अनी मनं नवं नाव
त्यासनावर लिखसु.
13 जर तुमले कान शेतस तर आत्मा मंडळीसले काय म्हणस हाई ऐका.

## लावदिकीयाना मंडळीले संदेश

14 लावदिकीया माधली मंडळीना देवदूतले लिख;

जो आमेन, जो ईश्वसनीय अनं खरा साक्षी, जो देवना सृष्टीना शासक तो अस
म्हणस.
15 तुना कृत्य माले माहित शेतस; तु थंड नही अनं गरम नही. तू थंड किंवा गरम
राहता तर बरा व्हतं;
16 पण तू तसा नही, कोमट शे; म्हणजे गरम नही, थंड नही, म्हणीन मी तुले
मना तोंडमातीन वकी टाकणार शे.
17 मी श्रीमंत शे, मी धन मिळायेल शे, अनं माले काही कमी नही अस तु म्हणस;
पण तू कष्टी, दीन, दरीद्री, आंधया अनं उघडावाघडा शे, हाई तुले कळस नही.
18 म्हणीन मी तुले सल्ला देस की, श्रीमंत व्हवाकरता तू आगघाई शुध्द करेल
सोनं मनापाईन ईकत ले; तुनी लज्जास्पद नग्नता दिसाले नको म्हणीन घालाले शुभ्र
कपडा ईकत ले; अनी तुले दृष्टी येवाले पाहिजे म्हणीन डोयामा टाकाले अंजन ईकत
ले.
19 ✡जितलासवर मी प्रेम करस तितलासना निषेध करीसन त्यासले शिक्षा करस;
म्हणीन आस्था बाळग अनी पश्चाताप कर.
20 दखा, मी दारमा उभा शे अनं दार ठोकी राहिनु; जर कोणी मना आवाज
ऐकीन दार उघडी, तर मी त्यानाजोडे मझार जासु अनं त्यानासंगे जेवसु, अनी तो
मनासंगे जेवण करी.
21 मी जसा विजय मिळाईन आपला पितासंगे त्याना राजासनवर बसनु, तसा जो
विजय मिळावस त्याले मी आपला राजासनवर आपलासंगे बसु दिसु.
22 जर तुमले कान शेतस तर आत्मा मंडळीसले काय म्हणस हाई ऐका.

---

✡ **3:12** ३:१२ प्रकटीकरण २१:२ ✡ **3:19** ३:१९ इब्री १२:६

# 4

## स्वर्गमा आराधना

1 यानंतर मी दखं, स्वर्गमा एक दार उघडेल माले दखायनं अनी जो आवाज मी
पहिले ऐकेल व्हता तो मनासंगे बोलणारा कर्णाना आवाजमायक व्हता; तो बोलणा,
“इकडे वर ये, म्हणजे ज्या गोष्टी यानंतर घडी येवाले पाहिजे त्या मी तुले दखाडसु”
2 लगेच आत्मानी मना ताबा लिधा. मी दखं, स्वर्गमा राजासन ठेयल व्हतं, अनी
त्या राजासनवर कोणतरी बशेल व्हतं.
3 जो बशेल व्हता तो दिसाले यास्फे अनं सार्दि ह्या रत्नसनामायक व्हता.
राजासनना आजुबाजूले दिसाले पाचे*ना मायक इंद्रधनुष्य व्हतात;
4 राजासनना आजुबाजूले चोवीस आसन व्हतात; अनी त्या आसनसवर शुभ्र
कपडा घालेल अनं डोकावर सोनाना मुकुट घालेल चोवीस वडील लोक बशेल
व्हतात;
5 ✡राजासनमातीन ईजा, आवाज अनं मेघगर्जना निंघी राहिंतात; पेटेल सात
मशाली राजासनपुढे जळी राहिंत्यात; त्या देवना सात आत्मा शेतस.
6 राजासनपुढे स्फटिकनामायक जशा काय काचना समुद्र व्हता; अनी
राजासनना मध्यभागले अनं राजासनना चार बाजुले, पुढे अनं मांगे डोयासनी भरेल
चार जिवत प्राणी व्हतात.
7 पहिला प्राणी सिंहनामायक, दुसरा बैलनामायक, तिसरा माणुसना
तोंडनामायक, अनं चौथा प्राणी उडणारा गरूडनामायक व्हता.
8 त्या चारी बी प्राणीसले प्रत्येकी सहा, सहा, पंख व्हतात त्या प्राणी मांगतीन
अनं पुढतीन पुरा डोयासनी भरेल व्हतात, अनी, “पवित्र, पवित्र, पवित्र, जो व्हता,
जो शे, अनं जो येणार शे तो सर्वसमर्थ प्रभु देव” असा त्या रातदिन म्हणतस, त्या
कधीच थांबतस नही.
9 राजासनवर बशेल जो युगानुयुग जिवत शे त्याना जवय जवय त्या प्राणी गौरव,
सन्मान अनं उपकारस्तुती करतस,
10 तवय त्या चोवीस वडील लोक राजासनवर जो बशेल त्यानापुढं गुडघा
टेकतस; जो युगानुयुग जिवत त्यानी आराधना करतस; अनी आपलं मुकुट
राजासनपुढे ठिसन म्हणतस,

---

* **4:3 4:3** पाचे पाचे हाई एक रत्नं नाव शे. ✡ **4:5** ४:५ प्रकटीकरण ८:५; ११:१९; १६:१८; प्रकटीकरण
१:४

11 “हे प्रभु, आमना देव, गौरव, सन्मान अनं सामर्थ्य यासना स्विकार कराले
तु योग्य शे; कारण तु सर्वकाही निर्माण करं, तुना ईच्छातीन त्यासले जिवन अनं
अस्तित्व वनं.”

# 5

## कोकरा अनी गुंडाळी

1 जो राजासनवर बशेल व्हता त्याना उजवा हातमा पाठपोट लिखेल अनं सात
शिक्का मारीन बंद करेल पुस्तकनी एक गुंडाळी मी दखी;
2 अनी “गुंडाळी वरना शिक्का फोडीन ती उघडाले कोण योग्य शे?” अस
जोरमा पुकारणारा एक ताकदवान देवदूत मी दखा.
3 तवय स्वर्गमा, पृथ्वीवर अनी पृथ्वीना खाल कोणी बी ती गुंडाळी उघडाले
किंवा तिनामा दखाले समर्थ नव्हता.
4 हाई गुंडाळी उघडाले किंवा तिनामा काय शे हाई दखाले योग्य अस कोणीच
सापडनं नही म्हणीन माले खुप रडु वना.
5 तवय वडील मंडळीसपैकी एकजण माले बोलना, “रडु नको; दख, यहुदा
वंशना सिंह, दावीदना वंशज यानी विजय मियाडा; म्हणीन तो तिना सात शिक्का
तोडीन ती गुंडाळी उघडाले योग्य ठरेल शे.”
6 तवय ज्याना जसा काय वध करामा येल व्हता असा कोकराले राजासनना
मझार दखं अनं त्याना आजुबाजू चार जिवत प्राणी अनी वडीलमंडळी यासले मी
दखं, त्याले सात शिंगं अनं सात डोया व्हतात; त्या सर्वा पृथ्वीवर धाडेल देवना सात
आत्मा शेतस.
7 कोकरानी जाईन राजासनवर जो बशेल व्हता त्याना उजवा हातमातीन ती
गुंडाळी लिधी.
8 त्यानी गुंडाळी लिधी तवय त्या चार प्राणी अनं चोवीस वडील लोकं
कोकरानापुढं गुडघा टेकनात. त्या प्रत्येकजोडे वीणा अनं धुपतीन भरेल सोनान्या
वाट्या व्हत्यात; त्या वाट्या म्हणजे देवना लोकसन्या प्रार्थना.
9 त्या नवं गाणं म्हणतस;

“तू गुंडाळी लेवाले अनं तिना शिक्का तोडाले योग्य शे;
कारण तुले मारामा येल व्हतं अनी तू आपला रक्तघाई सर्व वंश, जमात,
येगयेगळ्या भाषा बोलणारा लोक अनं राष्ट्र यासनामातीन आमना
देवकरता ईकत लेयल शेतस.

10 ✡अनी आमना देवनी सेवा कराकरता त्यासले याजकीय राज्य अस करेल शे
अनी त्या पृथ्वीवर राज्य करतीन.”

11 तवय मी परत दखं राजासन, चार जिवत प्राणी अनं वडील लोकं यासना आजुबाजू बराच देवदूत उभा राहीनात अनी माले त्यासना आवाज वना; त्यासनी संख्या हजारसमा अनं लाखमा व्हती!
12 त्यासनी मोठा आवाजमा गाणं म्हणं;

वध करामा येल व्हता कोकरा सामर्थ्य, धन, ज्ञान, बल,
सन्मान, गौरव अनं स्तुती ह्या लेवाले योग्य शे!

13 अनी स्वर्गमा, पृथ्वीवर, पृथ्वीना खाल अनं समुद्रवर जो प्रत्येक सजीव प्राणी शे तो, अनी त्यामाधली सर्व वस्तु यासले मी अस गातांना ऐकं;

“राजासनवर बशेल या कोकराले,
स्तुती, सन्मान, गौरव अनं सामर्थ्य हाई युगानुयुग शेतस.”

14 तवय त्या चार जिवत प्राणी बोलणात, आमेन; अनी वडील मंडळीनी गुडघा टेकीन उपासना करी.

# 6

## शिक्का

1 मंग कोकरानी त्या सात शिक्कासपैकी एक शिक्का फोडा ते मी दखं, तवय चार प्राणीसपैकी एक मेघगर्जनासनामायक आवाजतीन, “ये!” असं बोलणा, ते मी ऐकं,
2 मंग मी दखं तो पांढरा घोडा, अनी त्यानावर बशेल स्वार माले दिसना; त्यानाजोडे धनुष्य व्हता, मंग त्याले मुकुट देवामा वना; तो विजेतानामायक विजयवर विजय मिळावत निंघना.
3 कोकरानी दुसरा शिक्का फोडा, तवय दुसरा प्राणी, “ये!” असं बोलणा, ते मी ऐकं.
4 तवय दुसरा घोडा निंघना; तो अग्नीनामायक लाल व्हता अनी त्यानावर बशेल स्वारकडे पृथ्वीवरली शांतता हरण करानं अनी लोकसकडतीन एकमेकसले मारी टाकानं काम सोपेल व्हतं; त्याले मोठी तलवार देवामा येल व्हती.

✡ **5:10** ५:१० प्रकटीकरण १:६

5 कोकरानी तिसरा शिक्का फोडा, तवय तिसरा प्राणी, “ये!” असं बोलणा, ते
मी ऐकं मंग मी दखं तो एक काळा घोडा, अनी त्यानावर बशेल कोणी एक माले
दखायना; त्याना हातमा तराजु व्हता;
6 अनी जश काही चार प्राणीसमातीन निंघेल आवाज मी ऐका, तो असा “एक
दिननी मजुरी किलोभर गहु, अनी तीनशेर जव; जैतुनना झाडे अनं द्राक्षमया यासनी
खराबी करू नको.”
7 कोकरानी चौथा शिक्का फोडा, तवय चौथा प्राणी, “ये!” अस बोलणा, ते
मी ऐकं.
8 मंग मी दखं, तो एक फिक्कट रंगना घोडा, अनी त्यानावर बशेल माणुस माले
दखायना, त्यानं नाव मृत्यु; अनी मृत्युलोक त्याना मांगेमांगे जाई राहिंता. त्यासले
युध्दघाई, दुष्काळघाई, रोगसघाई अनी पृथ्वीवरला श्वापदसकडतीन माणससले
मारी टाकाना अधिकार पृथ्वीना चौथा भागवर देवामा वना.
9 कोकरानी पाचवा शिक्का फोडा तवय मी वेदीखाल आत्मा दखात; त्या आत्मा
देवना वचनमुये अनं त्यासनी जी साक्ष देयल व्हती तिनामुये मारी टाकेल लोकसना
व्हतात.
10 त्या जोरमा वरडिन बोलणात, “हे सामर्थ्यशाली प्रभु, तू पवित्र अनं सत्य
शे. तू कोठपावत न्यायनिवाडा करावु नही अनी पृथ्वीवर राहणारा लोकसले शिक्षा
कराव नही?”
11 तवय त्या प्रत्येकले एक एक शुभ्र झगा देवामा वना अनी त्यासले असे सांगाम
वनं की, “तुमना संगेना दाससले अनं ईश्वासणारासले तुमनामायक मारी टाकतीन,
त्यासनी संख्या पुरी व्हवापावत तुम्हीन आखो थोडा येळ आराम करा.”
12 ✡कोकरानी सहावा शिक्का फोडा, ते मी दखं; तवय मोठा भूकंप व्हयना;
सुर्य केससनी बनाडेल खडबडीत कपडानामायक काळा व्हयना अनं पुरा चंद्र
रंगतनामायक लाल व्हयना.
13 अंजिरनं झाड मोठा वाराघाई हालावर त्याना कच्चा फयं जशा खाल पडतस
तसा आकाशमाधला तारा पृथ्वीवर पडनात.
14 ✡एखादं पुस्तकं गुंडाळतस तसं आकाश गुंडाळाईन निंघी गयं अनी सर्व
डोंगर अनं बेट आपआपला जागावरतीन सरकणात.
15 पृथ्वीवरला राजा अनं मोठा अधिकारी, सरदार, श्रीमंत अनं ताकदवान
लोक, अनी बाकीना सर्व लोके, सर्व दास अनं सर्व स्वतंत्र लोकं, गुहासमा अनं

✡ **6:12** ६:१२ प्रकटीकरण ११:१३; १६:१८; मत्तय २४:२९; मार्क १३:२४,२५; लूक २१:२५ ✡ **6:14** ६:१४ प्रकटीकरण १६:२०

डोंगरामाधला खडकसमा दपनात;
16 ✡अनी त्या डोंगरसले अनं खडकसले बोलणात, “आमनावर पडीन
राजासनावर जो बशेल शे, त्याना दृष्टीपुढतीन अनं कोकराना क्रोधपाईन आमले
दपाडा!
17 कारण त्यासना क्रोधना मोठा दिन येल शे, अनी कोण त्याना विरूध्द ऊभा
राहु शकस?”

# 7

## इस्राएलना एक लाख चौरेचाळीस हजार लोक

1 यानानंतर मी चार देवदूत पृथ्वीना चार कोपरावर ऊभा राहेल दखात, त्या
पृथ्वीवरतीन अनं समुद्रवरतीन वारा वाहाले नको अनं कोणता बी झाडले लागाले
नको म्हणीन पृथ्वीना चार वारासले आडाई राहिंतात.
2 मी आखो एक देवदूतले सूर्योदयना दिशातीन वर चढतांना दखं, त्यानाजोडे
जिवत देवना शिक्का व्हता; ज्या चार देवदूतसकडे पृथ्वीले अनं समुद्रले उपद्रव
करानं काम सोपेल व्हतं त्यासले तो मोठा आवाजतीन बोलणा,
3 “आमना देवना ज्या दास शेतस त्यासना कपाळवर आम्हीन शिक्का मारापावत
पृथ्वीले, समुद्रले अनं झाडसले उपद्रव करू नका.”
4 ज्यासनावर शिक्का मारामा वना त्यासनी संख्या मी ऐकी; इस्राएल लोकसना
सर्व बारा वंशसपैकी एक लाख चौरेचाळीस हजारसवर शिक्का मारामा वना.
5 प्रत्येक वंशपैकी बारा हजारसवर; यहुदा वंशपैकी बारा हजारसवर, रऊबेन
वंशपैकी बारा हजारसवर; गाद वंशपैकी बारा हजारसवर;
6 आशेर वंशपैकी बारा हजारसवर; नफताली वंशपैकी बारा हजारसवर; मनश्शे
वंशपैकी बारा हजारसवर;
7 शिमोन वंशपैकी बारा हजारसवर; लेवी वंशपैकी बारा हजारसवर; इस्साखार
वंशपैकी बारा हजारसवर;
8 जबूलून वंशपैकी बारा हजारसवर; योसेफ वंशपैकी बारा वंशपैकी बारा
हजारसवर; बन्यामीन वंशपैकी बारा हजारसवर शिक्का मारामा वना.

## मोठा समुदाय शुभ्र झगामा

✡ **6:16** ६:१६ लूक २३:३०

9 यानानंतर मी दखं तो सर्व वंश, जमात, राष्ट्रे अनं येगयेगळा भाषा बोलणारा
यासनापैकी कोणले मोजता वना नही असा, शुभ्र झगा घालेल अनं हातमा खजुरना
झाडन्या फांद्या लेयल, मोठी लोकसनी गर्दी राजासनसमोर अनं कोकरासमोर ऊभा
राहेल माले दखायनी.
10 त्या मोठा आवाजमा सांगी राहिंतात; "राजासनसमोर बशेल आमना
देवकडतीन अनं कोकराकडतीन, तारण शे!"
11 तवय राजासन, वडीलमंडळी अनं चार प्राणी यासना आजुबाजू सर्वा देवदूत
ऊभा व्हतात, त्या राजासनसमोर उपडा पडी देवनी आराधना करीसन,
12 बोलणात, "आमेन! उपकारस्तुती, गौरव, ज्ञान, धन्यवाद, सन्मान, सामर्थ्य
अनं ताकद ह्या युगानुयुग आमना देवना शेतस! आमेन!"
13 तवय वडील मंडळींपैकी एकनी माले ईचारं, "शुभ्र झगा घालेल ह्या कोण
शेतस अनं कोठेन वनात?"
14 ✡मी उत्तर दिधं, "माले नही माहित, गुरजी. तुमले माहित," तो माले बोलणा,
"मोठ्या संकटमातीन येतस त्या ह्या शेतस; यासनी आपला झगा कोकराना रंगतमा
धोईसन शुभ्र करेल शे.
15 यामुये त्या देवना राजासनसमोर शेतस; त्या अहोरात्र त्याना मंदिरमा त्यानी
सेवा करतस अनी राजासनवर बशेल त्याना उपस्थितीमा त्यासनं संरक्षण करी.
16 यानामुये त्या परत भूकेला असा व्हणार नहीत, अनं तहानेल व्हणार नहीत,
त्यासले सूर्य किंवा कोणती बी कडक उष्णता जाळाऊ नही,
17 कारण राजासनपुढे मध्यभागले राहणारा जो कोकरा त्यासना मेंढपाळ व्हई
अनं तो त्यासले वाट दखाडीन जिवनना पाणीना झराजोडे लई जाई; अनी देव
त्यासना डोयाना सर्व अश्रु पुसी टाकी."

# 8

## सातवा शिक्का

1 जवय कोकरानी सातवा शिक्का फोडा, तवय स्वर्गमा जवळपास अर्धा तास
शांतता व्हती.
2 तवय देवसमोर उभा राहेल सात देवदूत मी दखात. त्यासले सात कर्णा देवामा
वनात.

---

✡ **7:14** ७:१४ मत्तय २४:२१; मार्क १३:१९

3 मंग आखो एक देवदूत ईसन वेदीपुढे उभा राहिना. त्यानाजोडे धुपनी पेटी
व्हती; अनी राजासनना समोरना सोनाना वेदीवर सर्व देवना लोकसना प्रार्थनाससंगे
धुप ठेवाकरता त्यासनाजोडे भरपुर धुप देयल व्हता.
4 देवदूतना हाततीन धुपना धुर देवना लोकसना प्रार्थनाससंगे देवसमोर वर गया.
5 ✡तवय देवदूतनी धुपनी पेटी लिसन त्यामा वेदीवरनी आग भरीन पृथ्वीवर
टाकी अनी ढगसना गडगडाट अनं गर्जना व्हयन्यात, ईजा चमकन्यात अनं भूकंप
व्हयना.

## कर्णा

6 मंग ज्या सात देवदूतसजोडे सात कर्णा व्हतात त्या आपआपला कर्णा वाजवाले
तयार व्हयनात.
7 पहिला देवदूतनी कर्णा वाजाडा तवय रंगत मिसाळेल गारा अनं आग उत्पन्न
व्हईन त्यासनी पृथ्वीवर वृष्टी व्हयनी. पृथ्वीना एक तृतीयांश भाग जळी गया, एक
तृतीयांश झाडं जळी गयात, अनं सर्व हिरवं गवत राख व्हयनं.
8 मंग दुसरा देवदूतनी त्याना कर्णा वाजाडा, तवय आगघाई पेटेल मोठा
डोंगरनामायक काहीतरी समुद्रमा टाकाई गयं; समुद्रना एक तृतीयांश पाणीनं रंगत
व्हयनं,
9 अनी समुद्रमाधला प्राणीसपैकी एक तृतीयांश मरणात तसच एक तृतीयांश
जहाजसना नाश व्हयना.
10 मंग तिसरा देवदूतनी त्याना कर्णा वाजाडा तवय मशालनामायक पेटेल मोठा
तारा आकाशमातीन खाल पडना. तो नदीसना अनं झरासना एक तृतीयांश पाणीवर
पडना.
11 त्या तारानं नाव "कडूदवणा" व्हतं अनी पाणीना एक तृतीयांश भाग कडू
व्हयना अनी त्या पाणीघाई माणससपैकी बराच माणसं मरणात; कारण ते कडू व्हयेल
व्हतं.
12 मंग चौथा देवदूतनी त्याना कर्णा वाजाडा, तवय सूर्यना एक तृतीयांश, चंद्रना
एक तृतीयांश अनं तारासना एक तृतीयांश भाग यासनावर प्रहार व्हयना. त्यासना
तृतीयांश भाग अंधकारमय व्हयना अनी दिनना तस रातना बी तृतीयांश भागवर
प्रकाश दिसाले नको म्हणीन अस व्हयनं.
13 मंग मी दखं तवय एक गरूड अंतराळना मध्यभागमा उडतांना दखायना,
त्याले मोठा आवाजमा असं बोलताना मी ऐकं, "ज्या तीन देवदूत कर्णा वाजाडणार

✡ **8:5** ८:५ प्रकटीकरण ११:१९; १६:१८

शेतस त्यासना कर्णाना होणाऱ्या आवाजघाई पृथ्वीवर राहणारा लोकसवर अनर्थ!
अनर्थ! अनर्थ येवाव शे!”

# 9

1 मंग पाचवा देवदूतनी त्याना कर्णा वाजाडा, तवय एक तारा आकाशमातीन
पृथ्वीवर पडेल माले दखायना; त्यानाजोडे अथांग डोह*नी किल्ली दिधी.
2 त्या तारानी त्या किल्लीगाई अथांग डोह उघाडं, तो त्यानामातीन मोठी भट्टीना
धुरनामायक धूर बाहेर ईसन वर गया; अनी डोहना धूरघाई सूर्यप्रकाश अनं हवा ह्या
अंधकारमय व्हयनात.
3 त्या धुरमातीन टोळ निंघींसन पृथ्वीवर उतरनात; त्यासले पृथ्वीवर
ईच्चुनामायक शक्ती देयल व्हती.
4 त्यासले अस सांगेल व्हतं की, पृथ्वीवरला गवतले, कोणता बी हिरवळले अनं
कोणतं बी झाडले उपद्रव करानं नहीं; तर ज्या माणससना कपाळवर देवना शिक्का
नही त्यासले मात्र उपद्रव कराना.
5 त्या माणससले मारी टाकाना टोळसकडे सोपेल नव्हतं तर फक्त पाच महिना
पीडा देवानं सोपेल व्हतं; त्यासनापाईन व्हणारी पीडा, ईच्चु माणुसले डंक मारस
तवय व्हणारा पीडानामायक व्हती.
6 त्या पाच महिनासमा त्या मराना प्रसंग दखतीन, पण त्यासले तो मिळाव नहीं;
मरानी ईच्छा धरतीन, तरी मरण त्यासनापाईन दूर पळी.

7 त्या टोळसना आकार लढाईकरता तयार करेल घोडासना आकारना मायक
व्हता त्यासना डोकावर सोनानामायक दिसणारा मुकुट व्हतात अनी त्यासना चेहरा
माणससना चेहरानामायक व्हता.
8 त्यासना केस बाईसना केससनामायक अनी दात सिंहसना दातसनामायक
व्हतात.
9 त्यासनी छाती ज्याघाई झाकेल व्हती ती लोखंडी उरस्त्राणा†मायक दखाई
राहिंतात; अनी त्यासना पंखसना आवाज लढाईमा पयणारा बराच घोडासना रथसना
आवाजनामायक व्हता.
10 त्यासले ईच्चुसनामायक शेपुट अनं नांगा व्हतात अनी माणससले पाच महिना
पिडा देवानी शक्ती त्यासना शेपुटमा शे.

---

* **9:1 9:1** अथांग डोह पृथ्वीमाधली खोल जागा † **9:9 9:9** उरस्त्राणा छातीना रक्षाकरता कवच

11 अथांग डोहना दूत हाऊ त्यासनावर राजा शे अनी; इब्री भाषामाधला त्यानं
नाव अबद्दोन, अनी ग्रीक भाषामा त्यानं नाव अपल्लूओन शे. त्याना अर्थ म्हणजे
"नाश करनारा."
12 पहिला मोठा अनर्थ व्हई गया; दखा, यानानंतर आखो दोन मोठा अनर्थ येणार
शेतस.
13 मंग सहावा देवदूतनी त्याचा कर्णा वाजाडा, तवय देवनासमोरना सोनानी
वेदीना शिंगमातीन व्हयेल एक आवाज मी ऐका;
14 ज्यानाजोडे कर्णा व्हता त्या देवदूतले तो आवाज बोलना, "फरात महानदीवर
बांधीन ठेयल चार देवदूतसले मोकळ कर!"
15 तवय मानव जातींपैकी एक तृतीयांश माणससले मारा करता नेमेल येळ, दिन,
महिना अनं वरीस यासनाकरता तयार करेल ह्या चार देवदूत मोकळा व्हयनात.
16 स्वारसना सैन्यनी संख्या वीस कोटी व्हती; हाई त्यासनी संख्या मी ऐकी.
17 त्या दृष्टांतमा घोडा अनं त्यानावर घोडास्वार मी दखात; त्यासना उरस्त्राणे
आगनामायक लाल, नीळनामायक निळा, गंधकनामायक पिवळा रंगना व्हतात.
त्या घोडासना डोका सिंहना डोकानामायक व्हतात; अनी त्यासना तोंडमातीन,
आग, धूर अनं गंधक ह्या निंघी राहिंतात.
18 त्यासना तोंडमातीन निघणारी आग, धूर अनं गंधक या तीन पीडासमुये एक
तृतीयांश मानव जातीले मारी टाकात.
19 त्या घोडासनी शक्ती त्यासना तोंडमा अनं त्यासना शेपुटमा शे; त्यासनी शेपुट
सापसनामायक राहिसन त्यासले डोका शेतस, अनी त्यानाघाई त्या लोकसले पिडा
दि राहिंतात.
20 त्या पीडासघाई ज्या मरणात नही असा बाकीना मनुष्यनी आपला हातसघाई
करेल कामसपाईन परत फिरनात नहीं; म्हणजे भूतं अनं ज्यासले दखता, ऐकता
अनं चालता येस नही असा सोनाना, चांदीना, पितळना, दगडना अनं लाकुडना
मुर्ति यासनी पुजा करनं त्यासनी सोडं नहीं;
21 अनी त्यासनी करेल, हत्या, जादु, व्यभिचार अनं चोऱ्या यासना पाईन त्या
परत फिरनात नही.

# 10

## देवदूत अनं धाकली गुंडाळी

1 मी आखो एक सामर्थ्यशाली देवदूत स्वर्गमातीन खाली उतरतांना दखा; तो
ढगसले पांघरेल अनं त्याना डोकावर मेघधनुष्य व्हता, त्याना चेहरा सूर्यनामायक,
अनं त्याना पाय आगना खांब मायक व्हतात;
2 त्याना हातमा उघडेल एक धाकलं गुंडाळी व्हती; त्यानी आपला उजवा पाय
समुद्रवर अनं डावा पाय जमीनवर ठेवा,
3 तो सिंहसना गर्जननामायक जोरमा वरडना; तवय सात मेघगर्जनासनी उत्तर
दिधं.
4 त्या सात मेघगर्जनासनी उत्तर दिधं तवय मी लिखणार व्हतु; इतलामा
स्वर्गमातीन व्हयेल आवाज मी ऐका, तो बोलना; सात गर्जनासनी जे सांगं ते गुप्त
ठेव, ते लिखु नको.
5 ज्या देवदूतले समुद्रवर अनं जमीनवर उभं राहेल मी दखं, त्यानी आपला उजवा
हात स्वर्गकडे वर करीसन,
6 जो युगानुयुग जिवत शे, ज्यानी आकाश अनं त्यामा जे शे, पृथ्वी अनं तिनावर
जे शे ते, अनी समुद्र अनं त्यामा जे शे ते उत्पन्न करं, त्याना नावनी शपथ वाहीन
सांगं, “आखो येळ लागाव नही!
7 जवय सातवा देवदूत कर्णा वाजाडी, तवय देव त्यानी गुप्त योजना आपला दास,
संदेष्टा यासले सांगेल व्हतं ते पुर्ण व्हई.”
8 स्वर्गमातीन व्हयेल जो आवाज परत मी ऐकेल व्हता तो मनासंगे परत बोलतांना
मी ऐका; तो बोलना, “जा अनं समुद्रवर अनं जमीनवर उभा राहेल देवदूतना
हातमाधलं गुंडाळी जाईन ले.”
9 तवय मी त्या देवदूतकडे जाईन, ती धाकली गुंडाळी माले दे अस सांगं, तो
माले बोलना, “हाई ले अनी खाई टाक; हाई तुनं पोट कडू करी टाकी पण तुना
तोंडमा ते मधनामायक गोड लागी.”
10 तवय मी देवदूतना हातमातीन ती धाकली गुंडाळी लिधं अनं खाई टाकं; ती
मना तोंडमा मधनामायक गोड लागनं, तरी ते खावानंतर मनं पोट कडू व्हयनं.
11 तवय त्या माले बोलनात, “बराच राष्ट्र, लोके, भाषा अनं राजा यासनाबद्दल
तू परत संदेश देवालेच पाहिजे.”

# 11

## दोन साक्षीदार

1 नंतर मोजानी पट्टीनामायक एक बोरू कोणी तरी माले दिधा, अनी सांगं, “जा,
देवनं मंदिर अनं वेदी यासनं माप ले अनी मंदिरमा आराधना करनारा कितला शेतस
ते मोज.”
2 ✡पण मंदिरना बाहेरनं माप लेवु नको, कारण ते गैरयहूदीसले देयल शे अनी
त्या शेचाळीस महिना पवित्र शहर पायखाल तुडावतीन.
3 मना दोन्ही साक्षीदार ज्या गोणपाट घालेल व्हतीन त्यासले मी धाडसु अनी
त्या एक हजार दोनशे साठ दिन देवना संदेश सांगतीन.
4 पृथ्वीना प्रभुसमोर उभा राहणारा जैतुनना दोन झाडं अनं दोन समई ह्या त्या
दोन साक्षीदार शेतस.
5 त्यासले कोणी उपद्रव कराले दखस तर त्यासना तोंडमातीन आग निंघीन
त्यासना शत्रुसले खाई टाकस, कोणी त्यासले नुकसान पोहचाडाना प्रयत्न करा तर
त्यासले त्यानाप्रमाणेच मारी टाकामा येवो.
6 त्यासना संदेश सांगाना दिनसमा पाऊस पडाले नको म्हणीन आकाश बंद कराना
त्यासले अधिकार देयल शे; झरासना पाणीनं रक्त कराना अधिकार त्यासले शे, अनी
वाटी तवय पृथ्वीले सर्व पीडासनी पीडित कराना बी त्यासले अधिकार शे.
7 ✡त्यासनी आपली साक्ष देणं समाप्त करावर अथांग डोहमातीन श्वापदवर ईसन
त्यासनासंगे लढाई करी अनी त्यासले जिंकीन मारी टाकी.
8 अनी ज्या शहरमा प्रभुले क्रुसखांबवर खियामा येल व्हतं त्याना रस्तावर
त्यासना प्रेतं पडी राहतीन त्या शहरसले प्रतिकात्मक रितघाई त्यासले सदोम अनं
मिसर अस नाव सांगेल असा त्या मोठा शहर शेतस.
9 सर्वा लोकं, वंश, येगयेगळा भाषा बोलणारा अनं राष्ट्र यामाधला लोकं त्यासना
प्रेतं साडेतीन दिन दखतीन अनी त्या त्यासना प्रेतले कबरमा ठेवू देवावत नही.
10 अनी त्या दोन्हीसना मरणमुये पृथ्वीवरला लोकं आनंद करतीन. त्या उल्लास
करतीन अनं एकमेकसले बक्षीस धाडतीन, कारण त्या दोन्ही संदेष्टासनी पृथ्वीवर
राहणारासले पीडा देयल व्हती.
11 पुढे साडेतीन दिनस नंतर जिवनना आत्मा देवपाईन ईसन त्यासनामा घुसना,
तवय त्या आपला पायवर उभा राहिनात, अनी ज्यासनी त्यासले दखं त्यासले खुप
भिती वाटनी.
12 तवय त्या दोन संदेष्टासनी स्वर्गमातीन निंघेल मोठा आवाज ऐका, तो बोलना,
“इकडे वर या!” मंग त्या मेघारूढ व्हईसन स्वर्गमा निंघी गयात अनं त्या वर जाई
राहींतात तवय त्यासले त्यासना शत्रुसनी दखं.

✡ **11:2** ११:२ लूक २१:२४ ✡ **11:7** ११:७ प्रकटीकरण १३:५-७; १७:८

13 ✡त्याच येळले मोठा भूकंप व्हयना. तवय त्या शहरना दहावा भाग नाश
व्हयना, अनी सात हजार लोकं मरी गयात अनी बाकीना घाबरीन त्यासनी स्वर्गीना
देवनं गौरव करं.
14 दुसरा अनर्थ व्हई गया पण तिसरा अनर्थ लवकरच यवावं शे.

### सातवा कर्णा

15 नंतर सातवा देवदूतनी कर्णा वाजाडा, तवय स्वर्गमातीन मोठा आवाज वनात
त्या बोलनात, "जगनं राज्य आमना प्रभुनं अनं त्याना ख्रिस्तनं व्हयेल शे, अनी तो
युगानुयुग राज्य करी!"
16 तवय देवना समोर आपला आसनवर बशेल चोवीस वडील लोकं उपडा पडिन
देवले नमन करीसन आराधना करीसन बोलनात,
17 "हे प्रभु देवा, हे सर्वसमर्था, जो तु शे अनं व्हता!
तो तु आपलं महान सामर्थ्य धारण करेल शे
अनी राज्य अधिकार आपला हातमा लिधात म्हणीन आम्हीन तुनां आभार मानतस.
18 राष्ट्र क्रोधित व्हईनात, तुना क्रोधनी येळ वनी;
मरेलसना न्याय करानी येळ,
अनी तुना दास, संदेष्टा अनं तुना पवित्र लोकं अनं तुना नावनी भिती धरणार धाकलामोठा असा तुना सर्वा लोके,
यासले वेतन देवानी येळ अनी पृथ्वीना नाश करनारासनी नाश करानी येळ येल शे."
19 ✡तवय देवना स्वर्गमाधलं मंदिर उघडामा वनं, त्याना मंदिरमा त्याना करारना
कोश दखायना अनी ईजा चमकन्यात, गर्जना अनं ढगसना गडगडाट व्हयना, भूकंप
व्हयना अनं मोठं गारासनी वृष्टी बी व्हयनी.

# 12

### बाई अनी अजगर

1 नंतर आकाशमा एक महान रहस्यमय चिन्ह दखायनं; एक बाई दखायनी, ती
सूर्य पांघरेल व्हती अनी तिना पायखाल चंद्र अनं तिना डोकावर बारा तारासना मुकुट
व्हता.
2 तिले दिन व्हतात अनी प्रसुतीसना वेदनासतीन वरडी राहिंती.

---

✡ **11:13** ११:१३ प्रकटीकरण ६:१२; १६:१८ ✡ **11:19** ११:१९ प्रकटीकरण ८:५; १६:१८; प्रकटीकरण १६:२१

3 आकाशमा दुसरं एक रहस्यमय चिन्ह दखायनं; दखा, एक मोठा लाल अजगर
दखायना, त्याले सात डोका अनं दहा शिंगं व्हतात, अनी त्याना डोकवर सात मुकुट
व्हतात.
4 त्याना शेपटीघाई आकाशमाधला तारासना एक तृतीयांश तारा वढी लिधात
अनं त्या पृथ्वीवर फेकात. अनी ती बाई बाळले जन्म दि तवय तिनं बाळ खाई
टाकाले पाहिजे म्हणीन तो अजगर त्या बाईपुढे उभा राहीना.
5 मंग ती बाईनी एक पोऱ्याले जन्म दिधा, जो सर्व राष्ट्रसवर लोखंडी दंडाघाई
राज्य करी. पण त्या बाळले उचलीन देवकडे अनं त्याना राजासनकडे वर लेवामा
वनं.
6 ती बाई वाळवंटमा पळी गयी, तठे तिनं एक हजार दोनशे साठ दिन पोषण
व्हवाले पाहिजे, म्हणीसन देवनी तयार करेल तिनी जागा व्हती.
7 ✡तवय स्वर्गमा युध्द व्हयनं; मिखाएल अनं त्याना दूतसनी अजगरसंगे युध्द
करं; अनी त्यासनासंगे अजगर अनं त्याना दूतसनी बी प्रतीहल्ला करा;
8 पण अजगर हारी गया, अनी त्याले अनं त्याना दूतसले स्वर्गमा ऱ्हावानी
परवानगी राहीनी नही.
9 ✡मंग मोठा अजगरले खाल फेकामा वनं, सर्व जगले फसाडणारा दुष्ट अनं
सैतान म्हणेल जुना साप याले अनी सगळा त्याना दूतसले बी खाल पृथ्वीवर फेकामा
वनं.

10 तवय मी स्वर्गमा मोठा आवाज ऐका; तो बोलना, "आते तारण, सामर्थ्य अनं
राज्य आमना देवनं व्हयेल शे अनं अधिकार त्याना ख्रिस्तना व्हयेल शे; कारण जो
आमना भाऊसले अनी बहीणींसले दोष देणारा, आमना देवसमोर रातदिन त्यासनावर
दोष आरोप करनारा, तो स्वर्गमाईन खाल टाकामा येल शे.
11 त्यासले त्यानी कोकराना रंगतमुये अनं आपला साक्षना वचनमुये जिंकं अनी
त्यासनावर मरणनी येळ वनी तरी त्यासनी आपला जिववर प्रेम करं नही.
12 यामुये स्वर्गसवन अनं त्यामा राहणारासवन, उत्साह करा; पृथ्वी अनं समुद्र,
यानावर, अनर्थ ओढायेल शे. कारण आपला काळ थोडा शे अस समजीन भलताच
संतापेल सैतान उतरीन तुमनाकडे येल शे."

13 आपलाले पृथ्वीवर फेकामा येल शे हाई जवय अजगरले समजनं, तवय ज्या
बाईनी पोऱ्याले जन्म देयल व्हता तीना पाठलाग करानी सुरवात त्यानी करी.

✡ **12:7** १२:७ यहुदानं पत्र १:९ ✡ **12:9** १२:९ लूक १०:१८

14 त्या बाईनी आपला जागावर वाळवंटमा उडी जावानं म्हणीन तिले मोठा
गरूडना दोन पंख देवामा येल व्हतात; तठे साडेतीन वरीस अजगरपाईन सुरक्षित
राहिन तिनं पोषण व्हवाणं व्हतं,
15 मंग त्या बाईनी वाही जावाले पाहिजे म्हणीन त्या अजगरनी तिनामांगतीन
नदीनामायक पाणीना प्रवाह आपला तोंडमातीन सोडा.
16 पण बाईले पृथ्वीनी मदत करी; तिनी आपलं तोंड उघडीन अजगरनी आपला
तोंडमातीन सोडेल नदी गिळी टाकी.
17 त्यानामुये अजगर बाईवर संतापना अनी देवनी आज्ञा पाळणारा अनं
येशुबद्दलनी साक्ष देणारा असा तिना संतानसपैकी बाकीनासनासंगे लढाई कराले तो
निंघी गया;
